महाराष्ट्र शासन
## महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ २२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ २२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक:सीबीटी-०६२२/प्र.क्र.१४/२०२२/३१ दिनांक:- १४ डिसेंबर, २०२२

**-: प्रसिध्दीपत्रक:-**

**विषय: लघुलेखक/लघुटंकलेखक (इंग्रजी) चाळणी परीक्षा – २०२२ सुधारित प्रवेश प्रमाणपत्राबाबत.**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सोमवार, दिनांक २६ डिसेंबर, २०२२ रोजी नियोजित खाली नमूद तीन संवर्गाच्या संगणक प्रणालीवर आधारित चाळणी परीक्षेकरीता प्रवेश दिलेल्या उमेदवारांना **सुधारित प्रवेश प्रमाणपत्रे** आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीच्या https://mpsconline.gov.in संकेतस्थळावरील त्यांच्या खात्यामध्ये उपलब्ध करुन देण्यात येत आहेत:-

| अ.क्र. | पदाचे नाव | जाहिरात क्रमांक | सामायिक परीक्षा |
|---|---|---|---|
| १ | लघुलेखक, उच्च श्रेणी (इंग्रजी), गट-ब, अराजपत्रित | ४०/२०२२ | दिनांक २६ डिसेंबर, २०२२ दुपारी १२:०० ते ०१:०० सामायिक चाळणी परीक्षा |
| २ | लघुलेखक, निम्न श्रेणी (इंग्रजी), गट-ब, अराजपत्रित | ४२/२०२२ | |
| ३ | लघुटंकलेखक (इंग्रजी), गट-क | ४४/२०२२ | |

**२.** उपरोक्त पदाकरीता अर्ज सादर केलेल्या संबंधित उमेदवारांना सुधारित प्रवेश प्रमाणपत्रे उपलब्ध करून देण्यात आली आहेत. तसेच सुधारित प्रवेश प्रमाणपत्रामध्ये परीक्षेच्या नावासमोर "**सुधारित प्रवेश प्रमाणपत्र**" असा मजकूर नमूद करण्यात आला आहे.

**३.** परीक्षा कक्षात प्रवेश मिळविण्यासाठी आयोगाच्या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करुन प्रिंट केलेले **सुधारित** स्वरुपातील प्रवेश प्रमाणपत्र सोबत आणणे अनिवार्य आहे. **सुधारित प्रवेश प्रमाणपत्र** असा मजकूर नमूद नसलेल्या प्रवेश प्रमाणपत्राच्या आधारे परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

ठिकाण: मुंबई

सह सचिव, दक्षता, धोरण व संशोधन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग